पोलीस कोठडीत होणारे मृत्यूप्रकरणाबाबतची माहिती, घटना घडल्यापासून किंवा घटनेची माहिती कळल्यापासून २४ तासाच्या आत राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना कळविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
परिपत्रक क्र. एचआरसी १०९७/१७४/पोल-१४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: ६ नोव्हेंबर, १९९७

वाचावे:-१] शासन परिपत्रक क्र. गृह विभाग क्र. एचआरसी ११९४/जीआय/२७३/सीआर३/विशेष-१[ब], दिनांक १५. २. १९९५.
२] शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एचआरसी १०९५/४१/पोल-१४, दिनांक १७. १. १९९६.
३] शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एचआरसी १०९६/२९८/पोल-१४, दिनांक १४. १०. १९९६.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
17 NOV 1997
शाखा
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

प रि प त्र क
= = = = = = = =

पोलीस कोठडीत होणारे मृत्यू व न्यायालयीन कोठडीत होणार मृत्यू याबाबतचा अहवाल घटना घडल्यापासून २४ तासाच्या आत राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना कळविण्याचे शासन परिपत्रके अनुक्रमे दि. १५. ३. ९५ व दि. १७. १. १९९६ च्याव्दारे कळविले होते. तद्नंतर दि. १४. १०. १९९६ च्या शासन परिपत्रकान्वये जुवेनाईल होम्स व निरनिराळ्या कायद्यांतर्गत चालविण्यात येणा-या इतर होम्स/संस्था यामध्ये होणारे मृत्यू व बलात्काराच्या घटना घडली त्या क्षणापासून २४ तासाच्या आत अहवाल आयोगास कळविण्याचे स्पष्ट आदेश सर्व संबंधितांना देण्यात आलेले होते.

२. उपरोक्त आदेशाप्रमाणे आयोगास सर्व घटनांचा अहवाल संबंधितांकडून पाठविण्यात येत असतो. परंतु आयोगास पाठविण्यात येणारे अहवाल काही प्रकरणात फारच त्रोटक स्वरुपात पाठविले जातात व त्यापाठोपाठ त्याप्रकरणाचे सविस्तर अहवाल पाठविले जातात. अशाप्रकारच्या माहिती/अहवालाची छाननी केल्यानंतर आयोगास असे आढळून आले आहे की, संबंधितांनी पाठविलेली माहिती अपुरी असून त्यासाठी अधिक माहितीची मागणी आयोगाकडून केली जाते. तरी अशा घटनांची सर्व आवश्यक ती माहिती प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून आयोगाने संबंधित अधिका-यांच्या उपयोगासाठी विवरणपत्र [ Format ] "Information Sheet for custodial death cases reported to the N.H.R.C." पाठविले आहे. आयोगाने योजल्यानुसार सदर विवरणपत्रात नमूद केलेल्या सर्व रकान्यात योग्य ती माहिती भरुन आयोगास पाठविण्यात यावी, असे आयोगाने शासनास पाठविलेल्या दि. १६ ऑक्टोबर, १९९७ च्या पत्राद्वारे कळविले आहे. [सोबत पत्राची व विवरणपत्राची प्रत जोडली आहे.]

..२..

तरी उपरोक्त परिच्छेद-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पोलीस कोठडीत अथवा न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यूप्रकरणीचा अहवाल [इंग्रजीत] मृत्यूची घटना घडलेल्या क्षणापासून किंवा घटना कळल्यापासून २४ तासाच्या आत सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील रकान्यात भरुन राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना विनाविलंब पाठविण्याची दक्षता घ्यावी व त्याची प्रत शासनास सादर करावी. कृपया उपरोक्त आदेशाचे कटाक्षाने पालन करावे.

सं. कृ. अय्यंगार
[ सं. कृ. अय्यंगार ] ६/११/९६.
प्रधान सचिव, गृह [विशेष], महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस उपमहानिरीक्षक,
सर्व विभागीय आयुक्त,
कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
संचालक, समाजकल्याण विभाग, पुणे,
सर्व गृह सचिव/उपसचिव, गृह विभाग.

दि.२०/१२/९६

कार्यनिशी लिपिक

क्र. अगृशा-पोल-२-३६७९
जिल्हादंडाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दि. २०/१२/९६

प्रति
उपविभागीय दंडाधिकारी ~~खेड~~ रत्नागिरी, दापोली, चिपळूण
२/- यांजकडे माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

अपर जिल्हा दंडाधिकारी